ePaper

| वर्ष - 8 | अंक - 11 | UDYAM-MH-26-0158827 |

# महाईन्यूज ™

लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!

www.mahaenews.com | मंगळवार, दिनांक 16 जुलै 2024 | पुणे आवृत्ती | mahaenews.com | maha_enews | Mahaenews

## “आरोप केलेत सिद्ध नाही झालेत” पूजा खेडकर यांचे पत्रकारांना उत्तर



### आतील पानांत

- लिओनेल मेस्सीचा मोठा पराक्रम!
- शुबमन गिलने रचला इतिहास
- पंतप्रधान मोदी आमचे शत्रू नाहीत
- केजरीवालांचं ८.५ किलो वजन घटलं

## आषाढीसाठी पंढरपूर जाणाऱ्या भाविकांची बस दरीत पडली

# पाच भाविकांचा मृत्यू!

### डोंबिवलीकडून पंढरपूरला यात्रेसाठी जात होते

। पुणे । महाईन्यूज

**मुंबई-पुणे महामार्गावर सोमवारी मध्यरात्री भीषण अपघात झाला. पंढरपूरकडे जाणारी ट्रॅव्हल्स बस मागून ट्रॅक्टरला आदळून दरीत कोसळली. या बसमध्ये 54 प्रवासी होते. या अपघातात पाच भाविकांचा मृत्यू झाला. डोंबिवलीकडून पंढरपूरला यात्रेसाठी जात होते. पाच जणांचा मृत्यू झाला आहे तर पाच जणांची प्रकृती गंभीर आहे. मध्यरात्री एकच्या दरम्यान ही घटना घडली. जखमींना रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. पहाटेच्या वेळी अंधारात ट्रॅक्टर न दिसल्याने बसने ट्रॅक्टरला जोरदार धडक दिली. त्यानंतर बस 20 फूट खाली दरीत कोसळली.**

अपघातासंदर्भात नवी मुंबईचे डीसीपी विवेक पानसरे यांनी सांगितले की, सोमवारी रात्री एक वाजण्याच्या सुमारास मुंबई-पुणे एक्स्प्रेस महामार्गावर अपघात झाला.

एका खासगी बसमधून 54 जण आषाढी एकादशीनिमित्त पंढरपूरला जात होते. प्रवाशांनी भरलेली ही बस ट्रॅक्टरला धडकली. त्यानंतर बस दरीत पडली. अपघातात जखमी झालेल्या 42 जणांना एमजीएम रुग्णालयात उपचारासाठी हलवण्यात आले आहे, तर इतर तीन जणांना शासकीय रुग्णालयात हलवण्यात आले आहे.



### दुसऱ्या अपघातात तरुणाचा मृत्यू

**नाशिक मुंबई महामार्गावर वैतरणा फाट्याजवळ भरधाव कंटेनरची मोटरसायकलने धडक दिली. या अपघातात कंटेनर मोटरसायकलस्वाराच्या डोक्यावरून गेल्याने मोटरसायकल स्वाराचा जागीच मृत्यू झाला. योगेश मदन परदेशी (वय ३०, राहणार खालची पेठ इगतपुरी) या तरुणाचा जागीच मृत्यू झाला. अपघात झाला त्या ठिकाणी पुलाचे काम चालू आहे. जागीच वळण आणि उतार आहे. त्या ठिकाणी दिशादर्शक फलकही नाही व मोठ्या प्रमाणत अंधार आहे. कंटेनर चालकाला घोटी पोलिसांनी घेतले आहे.**

### मृतांची संख्या वाढली

भाविकांनी भरलेली बस डोंबिवलीतील केळझर गावातून पंढरपूरला जात होती. मुंबई एक्स्प्रेस हायवेजवळ या बसने एका ट्रॅक्टरला धडक दिली. त्यावेळी घटनास्थळी चार जणांचा मृत्यू झाला. त्यानंतर आणखी एका जणाचा मृत्यू झाला. या अपघातात अनेक जण जखमी झाले आहेत. सर्व जखमींना जवळच्या एमजीएम रुग्णालयात दाखल करण्यात आले. १७ जुलै रोजी आषाढी एकादशी आहे. त्यासाठी विठ्ठुरुयाचे दर्शन घेण्यासाठी भाविक जात होते. परंतु काळाने पाच प्रवाशांना दर्शन घेऊ दिले नाही. आषाढी एकादशीला राज्यभरातून वारकरी दिंडीद्वारे पंढरपूरला जात असतात. ज्यांना दिंडीने जाणे शक्य होत नाही, ते भाविक बस आणि रेल्वेने पंढरपूर गाठतात. लाखोंची गर्दी आषाढीला पंढरपूरला होत असते.

## ‘उद्धव ठाकरे सोबत विश्वासघात, धोका देणारे सच्चे हिंदू नाहीत: शंकराचार्य

। मुंबई । महाईन्यूज

मातोश्रीवर पोहचल्यानंतर शंकराचार्य यांचे स्वागत संपूर्ण ठाकरे परिवाराने केले. यावेळी ते म्हणाले, उद्धव ठाकरे यांच्यासोबत विश्वासघात झाला आहे. महाराष्ट्रातील जनतेला हे माहीत आहे. ज्या लोकांनी उद्धव ठाकरे यांच्यासोबत विश्वासघात केला, ते हिंदू कसे असू शकतात? नेहमी वादात राहणारे उत्तराखंड ज्योतिष पीठचे शंकराचार्य अविमुक्तेश्वरानंद शिवसेना उबाठा पक्षाचे प्रमुख उद्धव ठाकरे यांची भेट घेतली. मातोश्रीवर जाऊन त्यांनी उद्धव ठाकरे यांची भेट घेतली. यावेळी उद्धव ठाकरे यांनी त्यांची पादुका पूजा केली आणि आशीर्वाद घेतले. यावेळी संपूर्ण ठाकरे परिवार आणि खासदार संजय राऊत उपस्थित होते. अयोध्या राम मंदिर प्राणप्रतिष्ठाला विरोध करुन शंकराचार्य अविमुक्तेश्वरनंद चर्चेत आले होते. मातोश्रीवर पोहचल्यानंतर शंकराचार्य यांचे स्वागत संपूर्ण ठाकरे परिवाराने केले. यावेळी ते म्हणाले, उद्धव ठाकरे यांच्यासोबत विश्वासघात झाला आहे.

## पुण्यातील प्राईम मतदारसंघासाठी मविआत रस्सीखेच

### ठाकरे गटाकडून सांगली पॅटर्नची चर्चा

। पुणे । महाईन्यूज । प्रतिनिधी।

विधानसभा निवडणुकीचे वारे वाहू लागल्याने महायुती आणि महाविकास आघाडी यांच्यातील अंतर्गत संघर्ष चव्हाट्यावर येऊ लागला आहे. महायुतीमधून दोन उमेदवार तर महाविकास आघाडीच्या तीन पक्षांमधील तीन तगडे उमेदवार पुण्यातील एकाच मतदारसंघासाठी




इच्छुक आहेत. त्यामुळे महाविकास आघाडीमध्ये चांगलीच रस्सीखेच पाहायला मिळत आहे. ठाकरे गटाच्या शिवसेनेकडून सांगली पॅटर्न होण्याची चर्चा दबक्या आवाजात सुरू आहे.

### महायुतीमध्ये रस्सीखेच

पुणे जिल्ह्यातील हडपसर विधानसभा मतदारसंघात महायुतीमधून विद्यमान आमदार चेतन तुपे यांच्यासह योगेश टिळेकर आणि नाना भानगिरे इच्छुक होते. टिळेकरांची वर्णी विधान परिषदेवर लागल्यानंतर विद्यमान आमदार चेतन तुपे आणि शहर प्रमुख नाना भानगिरे यांच्यात खेचाखेच होण्याची शक्यता आहे.

### हडपसरमध्ये सांगली पॅटर्नची चर्चा

सांगली लोकसभा निवडणुकीमध्ये महाविकास आघाडीतर्फे शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाकडून चंद्रहार पाटील यांना उमेदवारी देऊनही काँग्रेसचे विशाल पाटील अपक्ष उभे राहिले आणि त्यांनी लोकसभा निवडणूक मारली. त्याच प्रमाणे हडपसर विधानसभेमध्ये ठाकरे गटाच्या उमेदवाराला तिकीट मिळालं नाही, तर अपक्ष उभ राहून निवडणुका लढवणार, अशी महादेव बाबर यांची तयारी असल्याची चर्चा दबक्या आवाजात ठाकरे गटाच्या नेत्यांमध्ये केली जात आहे.

खरं तर चेतन तुपे आणि मित्रपक्षांनी काम करूनही लोकसभेचे अजितदादा गटाचे उमेदवार शिवाजीराव आढळराव पाटील यांना हडपसर मतदारसंघातून लीड मिळू शकलेली नव्हती.

# खेडकरांचे कारनामे संपता संपेनात!

## पूजा खेडकर यांचा खुलासाही घेण्याची सरकारची सूचना

। पुणे । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**वादग्रस्त प्रशिक्षणार्थी आयएएस अधिकारी पूजा खेडकर यांचे दररोज नवनवे कारनामे समोर येत आहेत. आता असाच एक नवा कारनामा उघडकीस आला आहे. पूजा खेडकर यांचे युपीएससीचे सर्व प्रयत्न संपले असतानाही त्यांनी नाव बदलून युपीएससीची परीक्षा दिल्याची माहिती समोर आली आहे.**



धक्कादायक म्हणजे त्यांनी 11 वेळा नाव बदलून परीक्षा दिल्याची माहिती आहे.पूजा यांनी 2020-21 पर्यंत खेडकर पूजा दिलीपराव या नावाने परीक्षा दिली. २०२१-२२ मध्ये प्रयत्न संपले असतानाही त्यांनी पूजा मनोरमा दिलीप खेडकर असा नावाच बदल केला आणि परीक्षा दिली. पूजा खेडकर यांना ओबीसी कोट्यातून ९ वेळा परीक्षा देता येते. पण, खेडकर यांनी नावात बदल करून तब्बल ११ वेळा परीक्षा दिली असल्याचं उघड झालं आहे. प्रशिक्षणार्थी आयएएस पूजा खेडकर यांनी पुण्यात आल्यानंतर वरिष्ठांवर केलेली अरेरावी, गुंडगिरी आणि मागण्यांमुळे अडचणीत आल्या. त्यानंतर त्यांची वाशिमला बदली करण्यात आली. पण त्यांचे महागडे शौकच त्यांना महागात पडले आणि त्यांची पोलखोल झाली. लाल दिव्याच्या गाडीचा शौकीमुळे त्यांचे सर्व कारनामे उघड केले. इतकेच नव्हे तर, आईवडिलांचेही पितळ उघडे पडले. पूजा खेडकर आणि त्यांच्या कुटुंबियांचे कारनामे समोर आल्यानंतर पंतप्रधान कार्यालयाने याची दखल घेतली आणि पुणे जिल्हाधिकाऱ्यांकडे या प्रकरणाचा संपूर्ण अहवाल मागवला. पुणे पोलिसांनी खेडकर प्रकरणात तपास सुरु केला असून यात त्या दोषी आढळून आल्यास त्यांचे निलंबन होऊ शकते. पूजा यांनी अहमद नगरच्या सरकारी जिल्हा रुग्णालयातून अपंगत्वाचं प्रमाणपत्र मिळवले. दृष्टीदोष आणि मानसिक आजार असल्याचेही प्रमाणपत्र मिळवले. याचाच फायदा घेत ओबीसी आणि बहुविकलांगता कोट्यातून यूपीएससी परीक्षा उत्तीर्ण केली.विकलांगतेचा लाभ घेता येत नसतानाही त्यांनी या दोन्हींच्या जोरावर प्रमाणपत्र मिळवून युपीएससी परीक्षा उत्तीर्ण केली.

### मी माझं म्हणणं मांडेन

दरम्यान, पूजा खेडकर यांच्या कुटुंबियांवर कारवाई सुरू असून त्यांच्या आई-वडिलांविरोधातही गुन्हा दाखल करण्यात आला आहे. माझ्यावर अनेक आरोप करण्यात आले आहेत. मात्र भारताच्या संविधानाने प्रत्येकाला अधिकार दिला आहे, जोपर्यंत एखाद्यावरचे आरोप सिद्ध होत नाहीत तोपर्यंत ती व्यक्ती आरोपी कशी काय ? असं पूजा खेडकर म्हणाल्या. तसंच माध्यमांद्वारे जे आरोप करण्यात येत आहेत.

# वारकऱ्यांसाठी राबवली जाणार पेन्शन योजना!

## वारकऱ्यांसाठी पेन्शन योजना राबवण्याचा सरकारचा निर्णय

।पुणे ।महाईन्यूज । प्रतिनिधी।

**महाराष्ट्राला वारकरी संप्रदायाची मोठी परंपरा लाभलेली आहे. सध्या आषाढी वारी सुरू असून यानिमित्ताने लाखो भाविक विठ्ठलाचे दर्शन घेण्यासाठी पंढरपूरला जात असतात. अशातच राज्य सरकारने वारकऱ्यांसाठी पेन्शन योजना राबवण्याचा निर्णय घेतला आहे. परंपरेनं महिनाभर वारी करणाऱ्या वारकऱ्यांना वृद्धपकाळात राज्य सरकारकडून पेन्शन दिली जाणार आहे. या संदर्भातील शासन निर्णय हा मुख्यमंत्री वारकरी महामंडळाच्या वतीने जारी करण्यात आला आहे.**

पायी वारी करणाऱ्या वारकऱ्यांसाठी आणि कीर्तनकारांसाठी कल्याणकारी योजना राबण्यासाठी 'मुख्यमंत्री वारकरी महामंडळ' स्थापन करण्याचा निर्णय रविवार ( 14 जुलै) रोजी घेण्यात आला. या महामंडळाच्या माध्यमातून वारकऱ्यांना सोयी सुविधा पुरवल्या जाणार आहेत. तसेच वारकऱ्यांच्या प्रश्नांचे निराकरण केले जाणार आहे. प्रशासकीय सेवेतील अधिकारी आणि निवृत्त अधिकारी यांची महामंडळ व्यवस्थापकीय संचालक म्हणून नियुक्ती करण्यात येणार आहे. या महामंडळासाठी 50 कोटी रुपयांचे भांडवल देण्यात येणार आहे. या महामंडळाचे मुख्यालय पंढरपूरमध्ये असणार आहे. राज्य सरकारच्या या योजनेचा राज्यातील लाखो वारकऱ्यांना मोठा फायदा होणार आहे.राज्यातील सर्व पालखी मार्गांचे सुधारणा, सुधारणा , स्वच्छता, आरोग्य, निवारा यांच्यासाठी दरवर्षी आर्थिक तरतूद करून नियोजन केले



जाणार; आषाढी आणि कार्तिकी वारीसाठी येणाऱ्या वारकऱ्यांसाठी सुरक्षा आणि विमा सुरक्षा कवच देण्यात येणार; वारकरी मंडळाला भजन आणि कीर्तन साहित्य जसे की टाळ,मृदुंग, वीणा खरेदी करण्यासाठी अनुदान दिले जाणार; कीर्तनकारांसाठी मानधन सन्मान योजना आणि आरोग्य विमा योजना राबवली जाणार; इंद्रायणी, चंद्रभागा, गोदावरी व इतर नद्या प्रदूषणमुक्त करण्यासाठी उपाययोजना राबवणार; पंढरपूर, देहू, आळंदी , मुक्ताईनगर , सासवड, पिंपळनेर, त्र्यंबकेश्वर, पैठण, कोल्हापूर संस्थान, शेगाव, भगवानगढ, अगस्तीऋषी, संत सावता माळी समाज मंदिर अरण (तालुका माढा जिल्हा सोलापूर) व इतरही तीर्थक्षेत्रांचा विकास या महामंडळाच्या माध्यमातून करण्यात येणार आहे.महाराष्ट्राला वारकरी संप्रदायाची मोठी परंपरा लाभलेली आहे. सध्या आषाढी वारी सुरू असून यानिमित्ताने लाखो भाविक विठ्ठलाचे दर्शन घेण्यासाठी पंढरपूरला जात असतात. अशातच राज्य सरकारने वारकऱ्यांसाठी पेन्शन योजना राबवण्याचा निर्णय घेतला आहे. परंपरेनं महिनाभर वारी करणाऱ्या वारकऱ्यांना वृद्धपकाळात राज्य सरकारकडून पेन्शन दिली जाणार आहे. या संदर्भातील शासन निर्णय हा मुख्यमंत्री वारकरी महामंडळाच्या वतीने जारी करण्यात आला आहे. पायी वारी करणाऱ्या वारकऱ्यांसाठी आणि कीर्तनकारांसाठी कल्याणकारी योजना राबण्यासाठी 'मुख्यमंत्री वारकरी महामंडळ' स्थापन करण्याचा निर्णय रविवार (14 जुलै) रोजी घेण्यात आला. या महामंडळाच्या माध्यमातून वारकऱ्यांना सोयी सुविधा पुरवल्या जाणार आहेत. प्रशासकीय सेवेतील अधिकारी आणि निवृत्त अधिकारी यांची महामंडळ व्यवस्थापकीय संचालक म्हणून नियुक्ती करण्यात येणार आहे. या महामंडळासाठी 50 कोटी रुपयांचे भांडवल देण्यात येणार आहे. या महामंडळाचे मुख्यालय पंढरपूरमध्ये असणार आहे. राज्य सरकारच्या या योजनेचा राज्यातील लाखो वारकऱ्यांना मोठा फायदा होणार आहे.राज्यातील सर्व पालखी मार्गांचे सुधारणा, सुधारणा , स्वच्छता, आरोग्य, निवारा यांच्यासाठी दरवर्षी आर्थिक तरतूद करून नियोजन केले.

### कीर्तनकारांसाठी कल्याणकारी योजना

योजना राबवली जाणार; इंद्रायणी, चंद्रभागा, गोदावरी व इतर नद्या प्रदूषणमुक्त करण्यासाठी उपाययोजना राबवणार; पंढरपूर, देहू, आळंदी , मुक्ताईनगर , सासवड, पिंपळनेर, त्र्यंबकेश्वर, पैठण, कोल्हापूर संस्थान, शेगाव, भगवानगढ, अगस्तीऋषी, संत सावता माळी समाज मंदिर अरण (तालुका माढा जिल्हा सोलापूर) व इतरही तीर्थक्षेत्रांचा विकास या महामंडळाच्या माध्यमातून करण्यात येणार आहे.

# खंडणीसाठी भंगार व्यावसायिकाचे अपहरण!

## गुन्हे शाखेच्या खंडणी विरोधी पथकाने मोशी येथून केली दोघांना अटक

। पिंपरी-चिंचवड
।प्रतिनिधी : महाईन्यूज

**खंडणीसाठी तिघांनी मिळून एका भंगार व्यावसायिकाचे अपहरण केले. व्यावसायिकाकडून ऑनलाईन आणि रोख स्वरूपात तीन लाख रुपये घेतले. ही घटना लंबोदर वॉशिंग सेंटर येथे मोशी 12 जुलै आणि त्यानंतर घडली. यातील दोन आरोपींना पिंपरी चिंचवड गुन्हे शाखेच्या खंडणी विरोधी पथकाने मोशी येथून अटक केली. त्या दोघांकडून आठ लाख 27 हजारांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.**



बाळासाहेब बळीराम बांगर (वय 27, रा. शिक्षक कॉलनी, मेदनकरवाडी, चाकण पुणे), प्रवीण दत्तात्रय भालेराव (वय 29, रा. जयभवानीनगर, कोथरुड पुणे) अशी अटक केलेल्या आरोपींची नावे आहेत. ब्रिजेश्याम राममिलन यादव (वय 49, रा. पूर्णानगर, चिखली प्राधिकरण) यांनी एमआयडीसी भोसरी पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे.

पोलीस उपायुक्त संदीप डोईफोडे यांनी दिलेल्या माहितीनुसार, आरोपींनी फिर्यादी यादव यांना भंगारचा व्यवसाय करायचा असेल तर महिन्याला साडेतीन लाख रुपये खंडणी द्यावी लागेल, अशी 12 जुलै रोजी मागणी केली. तसेच यादव यांना लंबोदर वॉशिंग सेंटर मोशी येथे बोलावून घेतले. त्यानंतर तिथून त्यांना जबरदस्तीने कार मध्ये डांबून चाकण, नाशिक फाटा व मोशी येथे आणले. कोयत्याचा धाक दाखवून मारहाण करत जीवे मारण्याची धमकी देत त्यांच्याकडून फोन पे वरून 55 हजार रुपये तर रोख स्वरूपात एक लाख रुपये घेतले. त्यानंतर यादव यांना मोशी येथे सोडून दिले. पुन्हा 13 जुलै रोजी आणखी दीड लाख रुपये घेतले आणि आणखी 50 हजार रुपयांची खंडणी मागितली.

याबाबत यादव यांनी खंडणी विरोधी पथकाकडे तक्रार केली. खंडणी विरोधी पथकाने आरोपींचा ठाव ठिकाणा काढून मोशी प्रदर्शन केंद्राच्या पाठीमागील बाजूला आलेल्या आरोपींना अटक केली. आरोपी बाळासाहेब आणि प्रवीण यांच्याकडून एक लाख 65 हजार रुपये रोख रक्कम, तीन मोबाईल फोन आणि गुन्ह्यात वापरलेली कार असा एकूण आठ लाख 27 हजारांचा मुद्देमाल जप्त केला आहे.

ही कारवाई पोलीस आयुक्त विनयकुमार चौबे, अपर पोलीस आयुक्त वसंत परदेशी, पोलीस उपायुक्त (गुन्हे) संदिप डोईफोडे, सहायक पोलीस आयुक्त डॉ विशाल हिरे यांच्या मार्गदर्शनाखाली वरिष्ठ पोलीस निरीक्षक संतोष पाटील, उपनिरीक्षक सुनिल भदाणे, सहायक फौजदार अमर राऊत, पोलीस अंमलदार सुनिल कानगुडे, किरण काटकर, प्रदिप गोडांबे, चंद्रकात जाधव, विजय नलगे, प्रदिप गायकवाड, प्रदिप गुट्टे यांच्या पथकाने केली आहे.

### दोन्ही आरोपी पोलीस रेकॉर्डवरील

आरोपी बाळासाहेब बळीराम बांगर व प्रवीण दत्तात्रय भालेराव हे पोलीस रेकॉर्डवरील गुन्हेगार आहेत. त्यांच्या विरुध्द खंडणीसाठी अपहरण, खून, जबरी चोरी, बेकायदेशीर अग्निशस्त्रे बाळगणे, गंभीर दुखापत करणे व चोरी असे गंभीर गुन्हे दाखल आहेत. बाळासाहेब बांगर याला तडीपार करण्यात आले आहे.

### नागरिकांना आवाहन

कोणीही व्यक्ती धमकी, दमदाटी व इतर कोणत्याही कारणाने हप्ता व खंडणीची मागणी करत असल्यास निर्भिडपणे खंडणी विरोधी पथकास मोबाईल नंबर 7517751793 / INDGREVCELL-PCPC@MAH.GOV.IN / PIAEC.PCPC-MH@MAHAPOLICE.GOV.IN यावर संपर्क करावा, असे आवाहन पोलिसांनी केले आहे.

---

# सँडविक कॉलनीतील उद्यान सुशोभिकरणाचा 'श्रीगणेशा'

## आ. महेश लांडगे यांच्या हस्ते भूमिपूजन; भोसरी विधानसभा मतदार संघातील विकासकामांचा शुभारंभ

। पिंपरी ।
प्रतिनिधी : महाईन्यूज

**भोसरी विधानसभा मतदार संघातील सोसायटीधारक, सर्वसामान्य नागरिक आणि स्थानिक भूमिपुत्रांच्या हिताच्या दृष्टीने पायाभूत सोयी-सुविधा सक्षम करण्याबाबत सातत्याने पाठपुरावा करीत आहोत. सँडविक कॉलनी येथील उद्यानाच्या सुशोभिकरण कामाला सुरूवात झाली आहे, अशी माहिती भाजपा आमदार महेश लांडगे यांनी दिली.**



सँडविक कॉलनी उद्यान सुशोभिकरणाचे काम मार्गी लावण्याबाबत स्थानिक नागरिकांनी मागणी केली होती. त्यानुसार सदर कामाचे भूमिपूजन करण्यात आले. यावेळी माजी नगरसेविका भीमाताई फुगे, माजी स्थायी समिती सभापती संतोष लोंढे, माजी नगसेवक सागर गवळी, दत्ता गव्हाणे, कविता भोंगाळे, सम्राट फुगे यांच्यासह स्थानिक नागरिक उपस्थित होते.

दरम्यान, सदगुरूनगर येथे श्रीदत्त मंदिराच्या सभामंडपाचे काम मार्गी लावावे, अशी सूचना स्थानिक नागरिक आणि भाविकांनी केली होती. त्यानुसार सदर कामाचे भूमिपूजन करण्यात आले. यावेळी माजी नगरसेविका सारिका लांडगे, संतोष लांडगे, धनंजय लांडगे, प्रभाकर भिवरे, सुधीर सगेवर, रामदास चव्हाण, आण्णा लडकत, दिलीप कोठावळे, सुधीर थिटे, निलेश सरडे, गणेश उगले, शैलेश जाधव, सचिन चव्हाण, योगेश धादमे, राहुल काटकर, विशाल जैद, नितीन बढेकर, बाळासाहेब थोरात, सुमित थिटे तसेच, सद्गुरु महिला भजनी मंडळ. व स्थानिक नागरिक उपस्थित होते.

> भोसरी विधानसभा मतदार संघाच्या सर्वांगीण विकासाकरिता आम्ही महापालिका, राज्य सरकार आणि केंद्र सरकारच्या विविध योजनांतून महत्त्वाकांक्षी प्रकल्प राबवत आहोत. तसेच, सोसायटीधारक, स्थानिक नागरिक यांना भेडसावणाऱ्या पायाभूत सोयी-सुविधांबाबतच्या समस्या तातडीने मार्गी लावण्यासाठी प्रयत्न केले जात आहेत.
>
> **– महेश लांडगे,**

### सातेरी देवी मंदिरात सीसीटीव्ही तैनात..

भोसरी विधानसभा मतदार संघातील सिंधुदुर्ग जिल्हा व्यवस्थापन प्रणित श्री. सातेरी देवी मंदिर, यमुनानगर, निगडी येथील मंदिर व्यवस्थापन व भाविकांनी सदर मंदिराला सीसीटीव्ही व्यवस्था करण्याबाबत मागणी केली होती. त्यानुसार, सदर यंत्रणा कार्यान्वित करण्यात आली. यावेळी मंदिर व्यवस्थापन समितीचे पदाधिकारी व भाविक उपस्थित होते. देव-देश अन् धर्मासाठी कटिबद्ध राहुया, असे आवाहन यावेळी आमदार महेश लांडगे यांनी उपस्थितांना केले.

### यमुनानगर येथील अंतर्गत रस्ते होणार प्रशस्त..

भोसरी विधानसभा मतदार संघातील प्रभाग क्रमांक १३ मध्ये यमुनानगर स्कीम नं. ५ व ६ मधील अंतर्गत तीन रस्ते काँक्रिटीकरण, तुळजा भवानी मंदिर रस्ता (अष्टविनायक मंदिर परिसर) नवीन पेव्हिंग ब्लॉक बसवण्याबाबत स्थानिक नागरिकांनी मागणी केली होती. त्यानुसार, सदर कामाचे भूमिपूजन करण्यात आले. यावेळी माजी क्रीडा समिती सभापती उत्तम केंदळे, माजी नगरसेविका कमल घोलप, इनामदार सर, श्रीकांत सुतार, भिमाजी पानमंद, प्रशांत बाराथे, रुपल माने, बाबा परब, रवींद्र कुकडे, रमाकांत पाटील, आदित्य कुलकर्णी, गिरीश देशमुख, संकेत चित्ते यांच्यासह स्थानिक नागरिक उपस्थित होते.



भूमिका

# प्रीपेड स्मार्ट मीटरचा वाद

**केंद्र सरकारच्या आरडीएसएस या वीजपुरवठा पायाभूत सुविधा विकास कार्यक्रमांतर्गत राज्यात स्मार्ट मीटर बसविण्याची योजना आहे. स्मार्टमीटर ग्राहकांना मोफतच मिळणार आहे, परंतु प्रीपेड स्मार्ट मीटरच्या विरोधात मोहीम सुरू झाली आहे.**

अत्याधुनिक डिजिटल तंत्रज्ञान वापरून वीज वापराबाबत अचूक आणि पारदर्शी नोंदींची व्यवस्था महावितरण सरकारी कार्यालये आणि स्वतःपासून उपलब्ध करून देत आहे. सध्या प्रीपेड स्मार्ट मीटर भारतात आसाम, बिहार, मध्यप्रदेश,जम्मू काश्मीर आदी राज्यात वापरले जात आहे. त्यासाठी केंद्राकडून आर्थिक मदत देण्यात येत आहे. स्मार्टमीटर ग्राहकांना मोफतच मिळणार आहे. त्यांना त्यासाठी प्रत्यक्ष अथवा अप्रत्यक्षरीत्या कोणत्याही प्रकारे शुल्क आकारले जाणार नाही, हे आधीच स्पष्ट करण्यात आले आहे. स्मार्ट मीटरमध्ये ग्राहकांचा वीजवापर मोजला जाईल आणि दूरवर असलेल्या सर्व्हरमध्ये त्याची आपोआप नोंद होईल. आपल्या मोबाइलचा वापर हा सेवा देणाऱ्या कंपनीकडे आपोआप नोंदविला जातो. वीज ग्राहकांना त्यांचा वीजवापर दर मिनिटाला त्याच्या मोबाईल फोनवर जाणून घेता येणार आहे. अत्यंत अचूक व पारदर्शीपणे रिडिंग हे स्मार्ट मीटरचे खास वैशिष्ट्य आहे. त्याच्या वापरामुळे वीज ग्राहकांच्या मीटरचे रिडिंग चुकीचे



घेतले, रिडिंग नियमितपणे घेतले नाही, अचानक जास्त वीज वापराचे वीज बिल आले, इतका वीज वापर झाला आणि मला समजलेच नाही अशा बिलिंगबाबतच्या समस्या पूर्णपणे संपुष्टात येणार आहेत. वीज कंपनीला प्रत्येक ग्राहकाच्या विजेच्या वापराची अचूक नोंद झाल्यामुळे वीज बिल वसुली आणि वीजपुरवठ्याचे व्यवस्थापन यामध्ये क्रांतिकारी सुधारणा करता येणार आहेत. विजेचे दर ठरविण्याचा अधिकार 'महाराष्ट्र विद्युत नियामक आयोगा'ला असतो. त्यामुळे हे दर महावितरण ठरवू शकत नसल्यामुळे स्मार्ट मीटर लावल्यानंतरही विजेचे दर आहेत तेवढेच राहणार आहेत. परिणामी स्मार्ट मीटरमुळे वीज महाग होईल, ६ हजार १३६रूपये किंमत असलेला स्मार्ट मीटर १२ हजार रूपयांना घेतला गेला आहे या अपप्रचाराला काहीही अर्थ नाही. मीटर बसवून देणाऱ्या खासगी एजन्सीला दहा वर्षे मीटरची देखभाल दुरूस्ती करणे, निर्मितीच्या दोषामुळे मीटरमध्ये बिघाड झाल्यास ते मोफत बदलणे, रिडिंग उपलब्ध करून देणे इत्यादी जबाबदाऱ्या पार पाडाव्या लागणार आहेत आणि त्यासाठी एजन्सीला वेगळा मोबदला दिला जाणार आहे. स्मार्टमीटर बसविण्यासाठी महावितरण कडून १६ हजार कोटी रूपयांचे कर्ज घेण्यात येणार आहे व त्याचा बोझा ग्राहकांवर पडून वीजदरवाढ होईल अशीही अफवा पसरविण्यात आली आहे. मात्र वस्तुस्थिती अशी आहे की, स्मार्ट मीटरसाठीचे पैसे संबंधित कंपन्यांना दहा वर्षात टप्प्याटप्प्याने द्यायचे आहेत व जेवढे मीटर बसतील तेवढ्या मीटर्सचेच पैसे द्यायचे आहेत. स्मार्ट मीटरसाठी द्यावे लागणारे पैसे महावितरणला आपल्या स्वतःच्या महसुलातून देता येतील व त्यासाठी स्वतंत्र कर्ज काढावे लागणार नाही. वाणिज्यिक हानी कमी झाल्याने आणि रिटर्न ऑन इक्विटी सुधारल्याने महावितरणला परतफेड करणे सोपे जाणार आहे. स्मार्ट मीटरमुळे वीज क्षेत्राचे खासगीकरण होईल, हा अपप्रचार आहे. महावितरण ही राज्य सरकारच्या मालकीची कंपनी आहे. ही मालकी कोण्या खासगी कंपनीला हस्तांतरित करण्याचा राज्य सरकारचा कोणताही विचार नाही. वीज ग्राहकांसाठी बसविण्यात येणारे विजेचे स्मार्ट मीटर हे अचूक बिलिंग,वीजवापराची नियमित माहिती व खर्चावर नियंत्रण ठेवण्याची सुविधा यामुळे वरदान ठरणार आहेत. स्मार्ट मीटरच्या वापरामुळे भविष्यात वीजवापराच्या वेळेनुसार कमी दरात वीज मिळण्याची सुविधाही उपलब्ध करता येणार आहे. अत्याधुनिक डिजिटल तंत्रज्ञान वापरून वीज वापराबाबत अचूक आणि पारदर्शी नोंदींची व्यवस्था महावितरण सरकारी कार्यालये आणि स्वतःपासून उपलब्ध करून देत आहे. सध्या प्रीपेड स्मार्ट मीटर भारतात आसाम, बिहार, मध्यप्रदेश,जम्मू काश्मीर आदी राज्यात वापरले जात आहे. त्यासाठी केंद्राकडून आर्थिक मदत देण्यात येत आहे. स्मार्टमीटर ग्राहकांना मोफतच मिळणार आहे. त्यांना त्यासाठी प्रत्यक्ष अथवा अप्रत्यक्षरीत्या कोणत्याही प्रकारे शुल्क आकारले जाणार नाही.

## प्रासंगिक »

### नियामक नियमन

***सापेक्षता आणि वस्तुनिष्ठता या संदर्भात न्यायालयाने उपस्थित केलेले मुद्दे यंत्रणेच्या विश्वासार्हतेवरच प्रश्न उपस्थित करणारे आहेत...***

दिवसागणिक अनेक नमुने आसपास पाहावयास मिळतील. आव्हान असते स्वत:च्या क्षेत्रातील कर्तव्यच्युतीची दखल घेण्याचे आणि उच्चपदस्थांस प्रिय; पण अयोग्य कृती दाखवून देण्याचे. हे आव्हान सर्वोच्च न्यायालय अलीकडे पेलताना दिसते ही मोठी दिलासा देणारी बाब. गेल्या आठवड्याच्या अखेरीस सर्वोच्च न्यायालयाच्या दोन स्वतंत्र पीठांच्या कृतीतून हा दिलासा मिळतो. व्यवस्थेविषयी बरे काही बोलावे, सांगावे असे अनुभव अधिकाधिक दुर्मीळ होत असताना सर्वोच्च न्यायालयाच्या या कृतींची दखल घेणे आणि तिचा प्रसार करणे आवश्यक ठरते.यातील पहिली घटना आहे ती न्या. अभय ओक आणि न्या. उज्जल भुयान यांनी पटणा उच्च न्यायालयास खडसावले त्याची. या न्यायालयाने एका खून प्रकरणातील आरोपीस जामीन तर दिला; पण त्याच्या जामिनावरील मुक्तता सहा महिन्यांनी होईल अशी अट घातली.

सध्याच्या काळात पक्ष आणि पक्षसंघटना या विषयाला दुय्यम मानण्यात येत असल्याचे दिसून येत आहे. तुम्ही आधिचा वर्ग पास झाले आणि नंतरच्या म्हणजे सध्याच्या वर्गात आले तरीही तुम्ही आधिच्याच वर्गाप्रमाणे विचार करीत असाल तर तुमचा नंतरच्या म्हणजे सध्याच्या वर्गात येऊन काय फायदा झाला?

# डॉ बाबासाहेब आंबेडकरांचा समूह विचार

आपण विभागल्या जावं असं तुम्हालाच काय कुणालाही वाटत नसते. पण तुमचं एकत्रित असणं हे एका जणाचं शल्य असतं. तो कुढत असतो. तुमच्या एकत्रित असण्याने त्याला काही करता येत नसते.डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी आपल्या चळवळीत पक्ष ही संकल्पना जी त्यावेळी प्रचलित होती त्याहून पुढे ती नेत तिला अधिकाधिक व्यापक केले आहे. ही संकल्पना मैत्रीचा परिसर विस्तारित ठेवणारी आहे. सामूहिक भोजनांप्रसंगी उपस्थित असतांना त्यांचे एकंदरीत व्यक्तिमत्व हे हातात पुस्तक धरून वाचत असणारा घोटू विद्यार्थी असे मुळीच नव्हते.तर अत्यंत हसत खेळत ती पार्टी होत असे. त्यात मद्य - धुम्र पानाला थारा नसे. तरीही सगळे एकत्वाच्या आनंदभावात तादात्म्य पावत असत. पक्ष आणि संघटना असावी. तिची बांधणी करावी या पलीकडचा हा आचार असे. त्यात स्वर्थांधतेला जागाच नव्हती. डॉ.बाबासाहेब आंबेडकर कास्टस् इन इंडिया या ग्रंथात म्हणतात की; "कास्ट सिंग्युलर नसते तर ती प्लुरल असते ."



जातीयता हा ब्राम्हणी विचाराचा पाया आहे.तो भारतीय संस्कृतीत ॲमलगम प्रमाणे घुसवला गेला आहे. जात अस्तीत्व हे एका पासून दुसऱ्याला भिन्न करते. अशा प्रत्येकाने स्वतःला स्वयंभू मानणाऱ्यांवर बाहेरच्या व्यक्तीला राज करणे सोपे जाते.म्हणून संघटीत असण्याला पर्याय असूच शकत नाही. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा समुह विचार भारतीय ऐक्याच्या दृष्टीने अत्यंत उपयुक्त असल्याने तो घेऊनच पुढे जाता येते. पण बाबासाहेबांमुळे मिळालेले खायचे आणि मान्य मात्र करायचे नाही. अशी प्रवृत्ती कशी काय जन्माला येत आहे..! हे एक कोडेच आहे.ते लक्षात येत नाही. या विषयानुषंगाने चर्चा करताना आपण समजून घेत आहोत. मानवाच्या प्रारंभिक विकास अवस्थेस अबोधावस्था म्हणूया.ही अवस्था डॉ.बाबासाहेब आंबेडकर स्वत: धारण करीत होते.(ते पुढे येणाऱ्या स्पष्टीकरणातून लक्षात येईल) एकंदरीत आपण सारेच त्याच दिशेने जात असल्याचे त्यांचे निरिक्षण आहे. देशोदेशी निव्वळ भ्रमंती न करता प्रत्यक्ष शिक्षण घेतले. समाजाभ्यासात स्वत:ला गुंतविले. तनतमा बाळगीली नाही.आश्चर्यांहून आश्चर्ये त्यांनी अनुभवले. जगात कुठेच नाही अशी जातीप्रथा फक्त माझ्याच देशात आहे. का? का म्हणून? अशा प्रश्नांनी त्यांना बेचैन केले....अखेर, हेच माझ्या देशाचं दु:ख आहे यावर त्यांनी शिक्कामोर्तब केल. कास्टस् इन इंडीया, अँनिहिलेशन ऑफ कास्टस् द्वारे या दु:खनिराकरणाचा प्रश्न ऐरणीवर आणला .पण बथ्थड राज्यकर्ते बधले नाहीत.प्रॉब्लेम्स ऑफ रुपीज लिहून त्यांनी राज्यकर्त्यांना हादरविले.आपली अर्थनीती कुचकामी असून आता आपण काढता पाय घ्यायला हवा असे इंग्रजांना निश्चीत वाटू लागले.

## ।। अभंगवाणी ।।



आजिवरी तुम्हां आम्हां नेणपण ।
कौतुकें खेळणें संग होता ॥१॥

आतां अनावर जालें अगुणाची ।
करूं नये तें चि करीं सुखें ॥२॥

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक-संपादक श्री. अधिकराव दिवे- पाटील** यांनी छत्रपती शिवाजी महाराज गोल मंडई, गाळा क्र. ७९/८०, संत तुकारामनगर, पिंपरी, पुणे- 411018 येथे पुणे विभागीय कार्यालयामधून प्रसिद्ध केले आहे. एमएसएमई नोंदणी क्रमांक : MH-26-0158827. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक-संपादक सहमत असतीलच असे नाही.
**कार्यकारी संपादक : वैष्णव जाधव । मुख्य कार्यकारी संपादक : सुनील आढाव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) विशेष सूचना: हा अंक कोणत्याची प्रकारच्या प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.

# दिलेलं आरक्षण न्यायालयात टिकावं!

## जरांगे माझ्यावर टीका का करतात मला समजत नाही-गिरीश महाजन

।नवी दिल्ली।

**वृत्तसंस्था : महाईन्यूज**

**“मनोज जरांगे पाटील माझ्यावरच टीका का करतात, हे मला कळत नाही”, असं ग्रामविकास मंत्री गिरीश महाजन यांनी म्हटलं आहे. “मराठा समाजाने टिकणारं आरक्षण घ्यावं, असं मी मनोज जरांगे पाटील यांना सुचवलं होतं. परंतु, माझ्या त्या वक्तव्याचा मनोज जरांगे यांना राग आला आहे, असं दिसतंय. आम्हाला (राज्य सरकार) फक्त इतकंच वाटतं की आमच्या सरकारने दिलेलं आरक्षण हे न्यायालयात टिकावं. तसं झालं नाही तर समाजाची फसवणूक होईल, त्यामुळेच आम्ही चाचपणी करत आहोत,” असं म्हणत महाजन यांनी जरांगेंबरोबरच्या वादावर त्यांची भूमिका मांडली. मनोज जरांगे पाटील यांनी अलीकडच्या काही सभांमधून राज्याचे अन्न व नागरी पुरवठा मंत्री छगन भुजबळ यांच्यासह गिरीश महाजन यांच्यावरही टीका केली होती.**



गिरीश महाजन म्हणाले, “मनोज जरांगे पाटील माझ्यावर टीका का करतात हे मला समजत नाही. मी त्यांना फक्त इतकंच म्हणालो होतो की मराठा समाजाने टिकणारं आरक्षण घ्यावं. आम्ही मराठा समाजाला गडबडीत आरक्षण दिलं आणि ते आरक्षण न्यायालयात टिकलं नाही, न्यायालयाने ते अवघ्या एका दिवसात निकाली काढलं तर उगाच समाजाची फसवणूक होईल. आमच्याकडून मराठा समाजाची फसवणूक व्हावी अशी आमची अजिबात अपेक्षा नाही. त्यामुळे मी मनोज जरांगेंना एवढंच म्हटलं की तुम्ही टिकणारं आरक्षण घ्या. त्यावरून त्यांना माझा राग आलेला दिसतोय.”टिकणारं आरक्षण घेण्याव्यतिरिक्त मी मनोज जरांगे पाटील यांना दुसरं काहीच बोललो नव्हतो. मी त्यांना पाच वेळा जाऊन भेटलो, त्यांच्याशी बोलणी करत होतो, राज्य सरकारचं शिष्टमंडळ घेऊन त्यांच्याकडे गेलो होतो. राज्य सरकारचा प्रतिनिधी म्हणून मी त्यांच्याशी अनेक विषयांवर चर्चा केली. आरक्षणावर तोडगा कसा काढता येईल यावरही चर्चा केली. मी वस्तुस्थितीला धरून त्यांच्याशी चर्चा केली. आता वस्तुस्थितीला धरून बोलल्यामुळे जर त्यांना माझा एवढा राग येत असेल आणि ते प्रत्येक प्रचारसभेत ते माझ्यावर बोलत असतील तर मी यावर काय प्रतिक्रिया देणार?हिंगोलीतील शांतता रॅलीत बोलताना मनोज जरांगे पाटील गिरीश महाजनांना इशारा देत म्हणाले होते, “तुमच्या एक गोष्ट लक्षात आली नाही.जामनेर विधानसभा मतदारसंघात १ लाख ३६ हजार कुणबी मराठ्यांचं मतदान आहे, हे विसरू नका.”“मनोज जरांगे पाटील माझ्यावरच टीका का करतात, हे मला कळत नाही”, असं ग्रामविकास मंत्री गिरीश महाजन यांनी म्हटलं आहे.“मराठा समाजाने टिकणारं आरक्षण घ्यावं, असं मी मनोज जरांगे पाटील यांना सुचवलं होतं. परंतु, माझ्या त्या वक्तव्याचा मनोज जरांगे यांना राग आला आहे, असं दिसतंय. आम्हाला (राज्य सरकार) फक्त इतकंच वाटतं की आमच्या सरकारने दिलेलं आरक्षण हे न्यायालयात टिकावं. तसं झालं नाही तर समाजाची फसवणूक होईल, त्यामुळेच आम्ही चाचपणी करत आहोत,” असं म्हणत महाजन यांनी जरांगेंबरोबरच्या वादावर त्यांची भूमिका मांडली. मनोज जरांगे पाटील यांनी अलीकडच्या काही सभांमधून राज्याचे अन्न व नागरी पुरवठा मंत्री छगन भुजबळ यांच्यासह गिरीश महाजन यांच्यावरही टीका केली होती. त्यावर महाजन यांनी प्रतिक्रिया दिली. गिरीश महाजन म्हणाले, “मनोज जरांगे पाटील माझ्यावर टीका का करतात हे मला समजत नाही. मी त्यांना फक्त इतकंच म्हणालो होतो की मराठा समाजाने टिकणारं आरक्षण घ्यावं. आम्ही मराठा समाजाला गडबडीत आरक्षण दिलं आणि ते आरक्षण न्यायालयात टिकलं नाही, न्यायालयाने ते अवघ्या एका दिवसात निकाली काढलं तर उगाच समाजाची फसवणूक होईल. आमच्याकडून मराठा समाजाची फसवणूक व्हावी अशी आमची अजिबात अपेक्षा नाही. त्यामुळे मी मनोज जरांगेंना एवढंच म्हटलं की तुम्ही टिकणारं आरक्षण घ्या. त्यावरून त्यांना माझा राग आलेला दिसतोय.”टिकणारं आरक्षण घेण्याव्यतिरिक्त मी मनोज जरांगे पाटील यांना दुसरं काहीच बोललो नव्हतो.

### त्यांच्याशी अनेक विषयांवर चर्चा

राज्य सरकारचा प्रतिनिधी म्हणून मी त्यांच्याशी अनेक विषयांवर चर्चा केली. आरक्षणावर तोडगा कसा काढता येईल यावरही चर्चा केली. मी वस्तुस्थितीला धरून त्यांच्याशी चर्चा केली. आता वस्तुस्थितीला धरून बोलल्यामुळे जर त्यांना माझा एवढा राग येत असेल आणि ते प्रत्येक प्रचारसभेत ते माझ्यावर बोलत असतील तर मी यावर काय प्रतिक्रिया देणार?हिंगोलीतील शांतता रॅलीत बोलताना मनोज जरांगे पाटील गिरीश महाजनांना इशारा देत म्हणाले होते,

---

# मुख्यमंत्री शिंदेंवर आमचा एक टक्काही विश्वास नाही

## आरक्षणाच्या मुद्द्यावर शरद पवारांनी मध्यस्थी करावी : लक्ष्मण हाके

।नवी दिल्ली।

**वृत्तसंस्था : महाईन्यूज**

**गेल्या काही दिवसांपासून राज्यात मराठा आणि ओबीसी आरक्षणाच्या मुद्द्यावरून राज्यात राजकीय वातावरण चांगलंच तापलं आहे. यावरून ओबीसी आणि मराठा नेत्यांमध्ये आरोप प्रत्यारोपही सुरु आहेत. एकीकडे मनोज जरांगे यांनी मराठ्यांना ओबीसीतून आरक्षण देण्याची मागणी केली आहे. तर दुसरीकडे ओबीसी नेते लक्ष्मण हाके यांनी या मागणीला विरोध केला आहे. या मुद्द्यावरून राजकीय प्रतिक्रिया उमटत आहेत.**

अशातच मराठा व ओबीसी आरक्षणाच्या मुद्द्यावर शरद पवारांनी मध्यस्थी करावी, यासाठी राज्याचे अन्न आणि नागरी पुरवठा मंत्री छगन भुजबळ यांनी आज शरद पवार यांची भेट घेतली. त्यामुळे चर्चांना उधाण आलं. यानंतर छगन भुजबळ यांनी माहिती देताना सांगितलं की शरद पवार दोन दिवसांमध्ये मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याशी चर्चा करतील. आता यावर लक्ष्मण हाके यांनी प्रतिक्रिया दिली. मात्र, यावेळी लक्ष्मण हाके यांनी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्यावर टीका केली. आत्ताच्या मुख्यमंत्र्यांवर आमचा एक टक्काही विश्वास नाही, असं लक्ष्मण हाके यांनी म्हटलं. ते एबीपी माझाशी



बोलत होते.आरक्षण देण्याचा अधिकार हा राज्य मागासवर्ग आयोगाला आहे. तसेच आरक्षण देण्याचा अधिकार खरा की खोटा हे ठरवण्याचा अधिकार सर्वोच्च न्यायालयाला आहे. आजपर्यंत चार राज्य मागासवर्ग आयोगाने मराठा समाजाचं मागासलेपण नाकारलं. सर्वोच्च न्यायालयाने यावर ६०० पानांचं जेजमेंट दिलं आहे. त्याही पलिकडे राष्ट्रीय मागासवर्ग आयोगानेही नकार दिलेला आहे. मग एवढ्या सर्व गोष्टी असताना तुम्ही या कुणबीच्या माध्यमातून ओबीसीमध्ये येऊ पाहत असाल तर ते सामाजिक अन्याय करणारं नाही का? या प्रश्नांची उत्तरं राज्य सरकारने द्यावीत, शरद पवार यांनीही पुढे येऊन सामाजिक न्यायाची भूमिका घ्यावी”, असं लक्ष्मण हाके यांनी म्हटलं आहे. राज्य सरकारने ओबीसींना जे आश्वासन दिलं, त्या पद्धतीने सरकार कार्य करत आहे का? या प्रश्नांवर बोलताना लक्ष्मण हाके म्हणाले, “आत्ताच्या मुख्यमंत्र्यांवर आमचा एक टक्काही विश्वास नाही. कारण कुणबी आरक्षण संपवण्याचा घाट मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी घातला आहे.

### आम्ही त्यांचं का ऐकणार नाही

आमच्या एखाद्या ओबीसी बांधवाला जात प्रमाणपत्र काढायचं म्हटलं तर दोन ते तीन महिने लागतात. त्यासाठी १९६० पूर्वीचे पुरावे द्यावे लागतात. मग सरकार टेबल लाऊन प्रमाणपत्र कसे देऊ शकतं? हा अधिकार कोणी दिला? तुम्ही खिरापत वाटत आहात का? यावर मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी कधीही चर्चेला बोलावं. तसेच शरद पवार यांनी मराठा बांधवांना सांगावं की ओबीसींच्या आरक्षणामुळे तुमच्यावर ही वेळ आली नाही. शरद पवार यांनी जर पुरोगामी भूमिका मांडली तर आम्ही त्यांचं का ऐकणार नाही”, असं लक्ष्मण हाके म्हणाले.

# पंतप्रधान मोदी आमचे शत्रू नाहीत

## » आम्ही हिंदू धर्म, सनातन धर्माचे पालन करणारे लोक आहोत

। नवी दिल्ली ।

**वृत्तसंस्था : महाईन्यूज**

**शंकराचार्य स्वामी अविमुक्तेश्वरानंद यांनी आज मुंबईचा दौरा केला. या दौऱ्यात त्यांनी उद्धव ठाकरेंची भेट घेतली. तसंच त्यांनी विविध मुद्द्यांवर भाष्य केलं. दिल्लीतल्या बुराडी भागात केदारनाथ मंदिर बांधले जाणार आहे, त्याबाबतही त्यांनी प्रतिक्रिया दिली. तसंच उद्धव ठाकरे यांच्यासह विश्वासघात झाल्याचंही त्यांनी म्हटलं आहे. तसंच त्यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदींबाबतही वक्तव्य केलं आहे.**




आम्ही हिंदू धर्म, सनातन धर्माचे पालन करणारे लोक आहोत. आपल्या धर्मात पाप आणि पुण्य ही संकल्पना मांडली आहे. पापामध्ये घात ही संकल्पना आहे. तर विश्वासघात हा सर्वात मोठा घात असल्याचं सांगितलं गेलंय. उद्धव ठाकरेंबरोबर सर्वात मोठा विश्वासघात झालेला आहे. याचे दुःख अनेक लोकांच्या मनात आहे. उद्धव ठाकरेंच्या विनंतीनंतर आज मी मातोश्रीवर आलो. आम्हीही त्यांच्याबरोबर झालेल्या विश्वासघातासाठी सहवेदना व्यक्त केल्या. जोपर्यंत तुम्ही पुन्हा महाराष्ट्राच्या मुख्यमंत्र्यांच्या खुर्चीवर बसत नाही. तोपर्यंत आमच्या मनातील दुःख दूर होणार नाही", अशी भावना यावेळी मी व्यक्त केल्याचंही अविमुक्तेश्वरानंद यांनी म्हटलं आहे.शंकराचार्य स्वामी अविमुक्तेश्वरानंद सरस्वती यांनी राम मंदिराविषयी मोठं वक्तव्य केलं होतं. अर्धवट बांधकाम झालेल्या मंदिरात प्राणप्रतिष्ठा करणं योग्य नाही. पंतप्रधान नरेंद्र मोदींनी प्राण प्रतिष्ठा सोहळा पुढे ढकलावा. २२ जानेवारीला होणारा प्राणप्रतिष्ठा सोहळा हा धर्मशास्त्राला धरुन नाही असं शंकराचार्य म्हणाले होते. तसंच २२ जानेवारी हा कुठलाही मुहूर्त नाही असंही त्यांनी म्हटलं होतं. आता नरेंद्र मोदी हे आमचे शत्रू नाहीत असंही त्यांनी म्हटलं आहे."मंदिर हे देवाचं रुप असतं. देवाचं शरीर म्हणजे मंदिर आणि मूर्ती म्हणजे देवाचा आत्मा. त्यातला कळस हे देवाचं शीर आहे. आता शिखर म्हणजेच देवाचे डोळे तेदेखील तयार झालेले नाहीत. पायापासून ते कळसापर्यंत देवाच्या अंगांची प्रतिष्ठापना केली जाते. चेहरा, कळस हे काहीही तयार झालेलं नाही. फक्त धड तयार आहे त्यात प्राणप्रतिष्ठा करणं चुकीचं आहे. ही कुठलीही सामान्य चूक नाही. असंही अविमुक्तेश्वरानंद यांनी म्हटलं होतं. आता मुंबईत आल्यांतर त्यांनी प्रति केदारनाथ मंदिरावर प्रश्न उपस्थित केले आहेत.पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी शंकराचार्य अविमुक्तेश्वरानंद यांचा आशीर्वाद घेतल्याचा या व्हिडीओ समोर आला होता. त्याबाबत विचारलं असता, अविमुक्तेश्वरानंद म्हणाले, "नरेंद्र मोदी आमचे शत्रू नाहीत. नरेंद्र मोदी आले त्यांनी नमस्कार केला, त्यांना आम्ही आशीर्वाद दिला. आम्ही त्यांचे हितचिंतक आहोत. त्यांच्या हिताच्या गोष्टी आम्ही सांगत आहोत. जर त्यांच्याकडून चूक झाली तर आम्ही त्यांची चूक दाखवून देतो, मोदी आमचे शत्रू नाहीत."आज शंकराचार्यांनी मुंबईचा दौरा केला. त्यांनी केदारनाथ मंदिराबाबत जे भाष्य केलं त्यावरुन आता त्यांना भाजपाचे नेते काही उत्तर देणार का? हे पाहणं महत्त्वाचं असणार आहे.SCAM : दिल्लीच्या बुराडी परिसरात बाबा केदारनाथ यांचे प्रतिकात्मक मंदिर बांधले जाणार आहे. यावरून आता उत्तरेत राजकारण तापले आहे. या नव्या मंदिरामुळे केदारनाथ धाम येथे नाराजी पसरली असून त्यांनी या नव्या मंदिराचा विरोध दर्शविला आहे. त्यातच बद्रीनाथ ज्योतिर्मठ पीठाचे शंकराचार्य स्वामी अविमुक्तेश्वरानंद यांनी आज केदारनाथ मंदिरातून चोरी झालेल्या सोन्याचा मुद्दा उपस्थित करत टीका केली. मुंबईत त्यांनी शिवसेना उबाठा नेते उद्धव ठाकरे यांची भेट घेतल्यानंतर माध्यमांशी बोलत असताना विविध राजकीय विषयांसह धार्मिक विषयावरही सडेतोड भाष्य केले.उत्तराखंडमधील केदारनाथ मंदिराच्या गाभाऱ्यातील सोने चोरी करून त्याठिकाणी पितळ ठेवले असल्याचा आरोप मागच्या वर्षी पहिल्यांदा करण्यात आला होता.

### मंदिर समितीने चोरीचे आरोप फेटाळले

मंदिरातील पुजाऱ्यांनीच हा आरोप केला होता. मात्र या आरोपाची छाननी करण्यास मंदिर समितीने ठाम विरोध दर्शविला. मंदिराचे पुजारी आणि चारधाम महापंचायतीचे उपाध्यक्ष संतोष त्रिवेदी यांनी मागच्यावर्षी सोशल मीडियावर व्हिडीओ पोस्ट करून सोने चोरी झाल्याचा आरोप केला होताशंकराचार्य स्वामी अविमुक्तेश्वरानंद मातोश्रीबाहेर माध्यमांशी बोलताना म्हणाले, केदारनाथ मंदिरात २२८ किलो सोन्याचा घोटाळा झाला आहे. यावर माध्यमे आवाज का उचलत नाहीत. आता दिल्लीत नवे केदारनाथ मंदिर बांधायची तयारी सुरू आहे. म्हणजे तिथेही नवा घोटाळा करणार का? केदारनाथ मंदिरातील सोन्याची चोरी झाल्यानंतर त्याचा तपास करण्यासाठी समिती का नाही स्थापन केली?

---

# तुरुंगात केजरीवालांचं ८.५ किलो वजन घटलं

## » तिहार तुरुंग अधीक्षकांनी फेटाळून लावले दावे

। नवी दिल्ली ।

**वृत्तसंस्था : महाईन्यूज**

**दिल्लीचे मुख्यमंत्री व आम आदमी पार्टीचे प्रमुख अरविंद केजरीवाल हे सध्या तिहार तुरुंगात आहेत. केजरीवाल हे दिल्ली सरकारच्या मद्य घोटाळा प्रकरणातील एक आरोपी असून अंमलबजावणी संचालनालय (ईडी) व केंद्रीय गुन्हे अन्वेशन विभाग (सीबीआय) त्यांची चौकशी करत आहेत. केजरीवाल हे उच्च मधुमेहाचे रुग्ण असून सातत्याने त्यांची प्रकृती खालावत चालली असल्याचे दावे त्यांच्या पक्षातील नेते करत आहेत.**



"मार्च महिन्यात केजरीवाल यांना तुरुंगात डांबल्यापासून आतापर्यंत त्यांचं ८.५ किलो वजन घटलं आहे." मात्र तिहार तुरुंग प्रशासनाने हे दावे फेटाळून लावले आहेत.तिहार तुरुंग अधीक्षकांनी स्पष्ट केलं आहे की "केजरीवाल यांचं वजन कमी झालं आहे, मात्र आप नेते दावा करत आहेत तितक्या प्रमाणात त्यांचं वजन घटलेलं नाही." तुरुंग अधीक्षकांच्या या वक्तव्यानंतर आप नेते संजय सिंह म्हणाले, "तुरुंग प्रशासनाने मान्य केलं आहे की केजरीवाल यांचं वजन कमी झालं आहे." दरम्यान, तिहार तुरुंग प्रशासनातील सूत्रांच्या हवाल्याने हिंदुस्तान टाईम्सने वृत्त प्रसिद्ध केलं आहे की केजरीवाल यांचं केवळ दोन किलो वजन घटलं आहे.आप नेत्यांचे वेगवेगळे दावे पाहून तिहार तुरुंग अधीक्षकांनी गृह विभागाला एक पत्र पाठवलं आहे. या पत्रात त्यांनी म्हटलं आहे, "१ एप्रिल २०२४ रोजी अरविंद केजरीवाल यांना पहिल्यांदा या तुरुंगात आणलं तेव्हा त्यांचं वजन ६५ किलोग्रॅम इतकं होतं.

### तुरुंग अधीक्षकांनी मांडली आकडेवारी

१० मे रोजी केजरीवाल जामीनावर तुरुंगातून सुटले तेव्हा त्यांच वजन ६४ किलोग्रॅम होतं." सर्वोच्च न्यायालयाने लोकसभा निवडणुकीसाठी केजरीवाल यांना २१ दिवसांसाठी अंतरिम जामीन दिला होता. १० मे ते १ जून असे २१ दिवस केजरीवाल यांनी देशभर आम आदमी पार्टीचा व इंडिया आघाडीच्या उमेदवारांचा प्रचार केला. जामीनाचा अवधी संपल्यानंतर २ जून रोजी त्यांनी आत्मसमर्पण केलं. तुरुंग अधीक्षकांनी म्हटलं आहे, "२ जून रोजी त्यांचं वजन तपासण्यात आलं. तेव्हा त्यांचं वजन ६३.५ किलोग्रॅम इतकं होतं. आत्ता (१४ जुलै) त्यांचं वजन ६१.५ किलोग्रॅम इतकं आहे."

# महेश बाबूच्या मराठमोळ्या पत्नीने घेतली सुधा मूर्तींची भेट

अनंत अंबानी व राधिका मर्चंट यांच्या लग्नाला अनेक सेलिब्रिटींनी हजेरी लावली होती. या लग्नासाठी राजकीय, सामाजिक, मनोरंजन, क्रीडा या क्षेत्रातील मंडळी एकाच ठिकाणी जमली होती. याठिकाणी अनेक कलाकारांनी एकमेकांच्या भेटी घेतल्या. मराठमोळी अभिनेत्री व तेलुगू सुपरस्टार महेश बाबूची पत्नी नम्रता शिरोडकर (NAMRATA SHIRODKAR) हिने सुधा मूर्ती (SUDHA MURTY) यांची भेट घेतली. तिने फोटो शेअर करत तिचा भेटीचा अनुभव सांगितला. नम्रता शिरोडकरने नुकतीच मुंबईत अनंत अंबानी आणि राधिका मर्चंटच्या लग्नाला हजेरी लावली होती. रेखा, नयनतारा, ऐश्वर्या राय आणि ज्योतिका यांच्याबरोबरचे अनेक फोटो ती तिच्या इन्स्टाग्रामवर शेअर करत आहे. आता नम्रताने लेखिका व राज्यसभा खासदार सुधा मूर्ती यांच्याबरोबरचा फोटो शेअर केला आहे. फोटो नम्रताने सुंदर ऑफ व्हाईट ड्रेस घातल्याचं पाहायला मिळत आहे, तर सुधा मूर्ती यांनी जांभळ्या रंगाची जरी वर्क असलेली साडी नेसली आहे.नम्रता शिरोडकरने



सुंदर फोटो शेअर करत त्याच्या कॅप्शनमध्ये लिहिलं, "मी हा क्षण कधीच विसरणार नाही... या बुद्धिमान महिलेबद्दल खूप काही ऐकलं होतं आणि त्यांना भेटल्यावर जे ऐकलं होतं त्यावर माझा विश्वास बसला आहे. कमालीच्या उत्साही आहेत. इतरांना त्या भरभरून प्रेम देतात! त्यांनी माझ्या आजीचं कौतुक केलं. इतकंच नाही तर माझे पती आणि माझ्या लेकीचंही कौतुक केलं, या आठवणी आयुष्यभर जपण्यासारख्या आहेत."नम्रताच्या या पोस्टवर नेटकरी कमेंट्स करून या फोटोचं कौतुक करत आहेत. अनेकांनी सुधा मूर्ती यांचंही कौतुक केलं आहे. चाहते यावर हार्ट इमोजी शेअर करत आहेत. नम्रताच्या बहिणीने माझं स्वप्न पूर्ण झालं अशी कमेंट या पोस्टवर केली आहे. दरम्यान, अनंत व राधिकाच्या लग्नाचे सलग तीन दिवस कार्यक्रम होते व या कार्यक्रमात पाहुण्यांची मांदियाळी होती. फक्त हिंदी सेलिब्रिटीच नाही तर दाक्षिणात्य, मराठी व भोजपुरी कलाकारांनाही रिसेप्शनसाठी निमंत्रित करण्यात आलं होतं. आशीर्वाद सोहळ्याला तर पंतप्रधान नरेंद्र मोदींनी हजेरी लावली होती. त्यांनी राधिका व अनंतला आशीर्वाद दिले होते. याशिवाय महाराष्ट्राचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, राज्यपाल, उपमुख्यमंत्री अजित पवार, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस हेही कुटुंबाबरोबर उपस्थित होते. शरद पवारही या कार्यक्रमाला हजर राहिले.

## दारूच्या बाटलीवरुन नोकराला मारहाण

पाकिस्तानी गायक राहत फतेह अली खान यांचा एक व्हिडिओ समोर आला आहे, ज्यामुळे सगळेच हैराण झाले आहेत. चाहत्यांनाही हा व्हिडीओ पाहून मोठा धक्का बसला आहे. समोर आलेल्या व्हिडिओमध्ये राहत फतेह अली खान आपल्याच नोकराला मारहाण करताना दिसत आहेत. ही मारहाण करताना टेबलावर ठेवलेली दारूची बाटली गेली कुठे, अशी विचारणाही ते करताना दिसत आहेत. हा व्हिडिओ पाहिल्यानंतर लोकांनी राहत फतेह अली खान यांच्यावर बरीच टीका केली आहे. नेटकऱ्यांनी सोशल मीडियावर राहत यांना चांगलेच खडेबोल सूनवायला सुरुवात केली. हे पाहताच राहत यांनी एक व्हिडीओ शेअर करत घडलेल्या प्रकाराबद्दल माफी मागितली आहे. व्हिडीओमध्ये राहत आपल्या घरातील काम करणाऱ्या नोकराला चपलेने मारताना अन् खेचतान दिसत आहेत.

## यामीच्या घरी गुडन्यूज?

बॉलिवूड अभिनेत्री यामी गौतमसध्या तिच्या आर्टिकल 370 या सिनेमामुळे चर्चेत आहे. काही दिवसांपूर्वीच आर्टिकल 370 या सिनेमातील तिचा फर्स्ट लूक पोस्टर प्रेक्षकांच्या भेटीला आला होता. याशिवाय टिझर आणि सिनेमाच्या रिलीज डेटबाबतही घोषणा करण्यात आली आहे. सिनेमाची घोषणा करण्यात आल्यानंतर अभिनेत्री यामी गौतमने पती आणि आई समवेत दिसली होती. दरम्यान आता यामीचा लूक पाहिल्यानंतर ती प्रेग्नंट असल्याच्या बातम्या व्हायरल होत आहेत. मात्र, या प्रेग्नंसीबाबत्या बातम्यांना यामीकडून कोणतेही प्रत्युत्तर देण्यात आलेले नाही. यामी गौतम आणि आदित्य धर मुंबईत एकत्रित स्पॉट झाली. यावेळी यामीने गुलाबी कलरचा सूट घातलेला दिसतोय. तर दिग्दर्शक आदित्य धर पांढऱ्या रंगाच्या कुर्त्यामध्ये यामीसोबत दिसत आहेत. दोघे एकत्रित दिसले आणि यामीच्या वेगळ्याच लूकने चाहत्यांचे लक्ष वेधलं आहे. यामी गौतम प्रेग्नंट असल्याच्या बातम्यांनी जोर धरलाय. दरम्यान यामीने गुलाबी सूटच्या ओढणीला वेगळ्या अंदाजात कॅरी करताना पाहिले. त्यामुळे सोशल मीडियावर चाहते यामी प्रेग्नंट असल्याची शक्यता वर्तवताना दिसत आहेत.



## प्रियांका चोप्राच्या पतीचं भारतात जोरदार स्वागत!

बॉलीवूडची देसी गर्ल प्रियांकाचा पती निक जोनास हा अमेरिकेतील प्रसिद्ध गायक आहे. निकचे मोठे भाऊ केविन आणि जो यांच्यासह 'जोनास ब्रदर्स' नावाचा त्यांचा बँड आहे, जो जगभरात प्रसिद्ध आहे. निक जोनास व त्याचे भाऊ केविन जोनास आणि जो जोनास हे भारतात आले आहेत. मुंबईच्या महालक्ष्मी रेसकोर्सवर शनिवारी त्यांचा भव्य संगीत कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. हा त्यांचा भारतातील पहिला संगीत कार्यक्रम होता. भारतात निक आणि जोनास ब्रदर्सचे प्रचंड चाहते आहेत. निक गाण्यासाठी स्टेजवर येताच जमलेल्या प्रेक्षकांनी 'जीजू' असे संबोधित निकचे स्वागत केले. किंग आणि निकच्या "तू मान मेरी जान" या कोलॅबरेटेड गाण्यावर प्रेक्षक मंत्रमुग्ध होताना दिसले.जोनास ब्रदर्सचा भारतात पहिलाच कार्यक्रम असल्याने चाहते अतिउत्साही दिसत होते. शनिवारच्या या कार्यक्रमाचे व्हिडीओ सध्या सोशल मीडियावर प्रचंड व्हायरल होताना दिसत आहेत. यात जोनास ब्रदर्स त्यांच्या कार्यक्रमाचा पुरेपूर आनंद घेताना दिसले.यातला मजेशीर भाग म्हणजे, जो आणि केविनने चाहत्यांना निकची ओळख 'जीजू' म्हणून करून दिली, त्यामुळे तिथे जमलेल्या प्रेक्षकांनी निकचा 'जीजू' 'जीजू' असा जयघोष करत स्वागत केले. २०२३ ला रीलिज झालेल्या ""तू मान मेरी जान' X 'आफ्टरलाईफ"" या गाण्यावर निक आणि किंगने एकत्र संगीत सादर केलं. कॉन्सर्टदरम्यान निक मजेशीररित्या प्रेक्षकांना म्हणाला, "भारतात परफॉर्म करण्याची आमची ही पहिलीच वेळ आहे. यात २०१८ मध्ये झालेल्या प्री वेडिंगमधला संगीत सोहळा ग्राह्य धरला जात नाही."भारतासाठी असलेल्या आपल्या भावना व्यक्त करत निक प्रेक्षकांना म्हणाला, "एक कुटुंब म्हणून आपलं या देशाशी घट्ट नातं आहे. तुम्हा या उत्साहपूर्ण स्वागतासाठी धन्यवाद. या संगीत कार्यक्रमासाठी तुमची उपस्थिती दर्शवल्याबद्दल मी तुमचा खूप आभारी आहे. या कॉन्सर्टची ही रात्र नक्कीच रोमांचक असेल, याचं मी आश्वासन देतो."

## आयशा खानने सांगितली धक्कादायक घटना

'बिग बॉस 17' या कार्यक्रमाचा ग्रँड फिनाले आज पार पडणार आहे. बिग बॉसच्या घरात वाईल्ड कार्ड एंट्री करणारी आयशा खान ही सध्या तिच्या वैयक्तिक आयुष्यामुळे चर्चेत आहे. आयशाचा एक एक व्हिडिओ व्हायरल होत आहे, ज्यामध्ये ती तिच्या बालपणाशी संबंधित एक धक्कादायक घटना सांगताना दिसत आहे. आयशानं एका मुलाखतीमध्ये सांगितलं की, ती 9 वर्षांची असताना एका व्यक्तीनं तिच्यासोबत वाईट कृत्य केलं होतं.आयशा खानने अलीकडेच सिद्धार्थ कन्नन्च्या मुलाखतीत तिच्यासोबत बालपणी घडलेल्या घटनेबद्दल सांगितलं. तिनं मुलाखतीमध्ये सांगितलं, "एक काका आले आणि त्यांनी मला बोलावले. मी विचारले, काय हवंय काका? त्यांनी मला एक पत्ता विचारला. मग त्यांना मी तो पत्ता सांगितला. मग त्यांनी विचारले की, मी तिथे तुला घेऊन जाऊ शकतो का? मी त्यांना होकार दिला."पुढे आयशा म्हणाली, "ते काका आणि मी एका इमारतीत गेलो. तिथून खाली येत असताना त्यांनी अचानक मला पायऱ्यांवर ढकलले. यानंतर ते माझ्यावर जबरदस्ती करू लागले. त्या क्षणी मला समजत नव्हते की, काय होत आहे. पण काहीतरी चुकीचं घडतंय हे माझ्या लक्षात येत होतं. पण नक्की काय होतंय? ते मी समजू शकले नाही. 9 वर्षांच्या मुलीला हे सर्व समजू शकत नाही. मला ओरडता येत नव्हते. त्यांनी माझ्या तोंडावर हात ठेवला. मीओरडण्याचा प्रयत्न करत होते मी त्यांना म्हणत होते, माझी आई तिथेच उभी आहे. प्लीज काका मला जाऊ द्या." यशानं पुढे मुलाखतीत सांगितलं.



# लिओनेल मेस्सीचा मोठा पराक्रम!

## फुटबॉल इतिहासात सर्वाधिक पदके जिंकणारा ठरला खेळाडू

नवी दिल्ली । वृत्तसंस्था

**अर्जेंटिनाचा महान खेळाडू लिओनेल मेस्सीने कोपा अमेरिका फायनल जिंकून आपल्या महान कामगिरीत आणखी एक भर घातली आहे. सोमवारी सकाळी झालेल्या अंतिम फेरीत ला अल्बिसेलेस्टेने कोलंबियाचा १-० असा पराभव केला. कोपा अमेरिका विजेतेपदाने मेस्सीला एक ऐतिहासिक यश मिळवून दिले. आता मेस्सी ब्राझीलच्या डॅनी अल्वेसचा विक्रम मोडत क्लब आणि देश या दोघांसह ४५ ट्रॉफी जिंकणारा पहिला खेळाडू ठरला आहे. मेस्सीचा रोझारियो येथील एका लहान मुलापासून ते फुटबॉलच्या इतिहासातील महान खेळाडूपर्यंतचा प्रवास जबरदस्त राहिला आहे.**



एकेकाळी आंतरराष्ट्रीय स्तरावर खराब कामगिरीमुळे टीकेला सामोरे जाणाऱ्या मेस्सीने आता अर्जेंटिनासह अवघ्या तीन वर्षांत चार प्रमुख विजेतेपदे जिंकली आहेत. ज्यामध्ये एक विश्वचषक, दोन कोपा अमेरिका विजेतेपदाचा समावेश आहे. त्याच्या शानदार क्लब कारकिर्दीत, मेस्सीने बार्सिलोनासह चार चॅम्पियन्स लीग विजेतेपदे आणि दहा ला लीगा चॅम्पियनशिप जिंकली आहेत. त्याच्या वैयक्तिक कामगिरीबद्दल बोलायचे, तर त्याच्याकडे विक्रमी आठ बॅलन डी’ओर्स आणि सहा युरोपियन गोल्डन बूट आहेत. एकूणच, मेस्सीने १,०६८ सामन्यात १२१२ गोल आणि असिस्ट केले आहेत, ज्यामध्ये ८३८ गोल आणि ३७४ असिस्टचा समावेश आहेत. यापैकी बहुतेक विजय बार्सिलोनाबरोबरच्या १७ वर्षांच्या कार्यकाळात मिळवले. त्याच्या पुरस्कारांमध्ये १२ लीग जेतेपदे (बार्सिलोनाबरोबर १०, पीएसजीसह दोन), चार यूईएफए चॅम्पियन्स लीग विजेते (सर्व बार्सिलोनासह) आणि १७ देशांतर्गत चषक (बार्सिलोनासह १५, पीएसजी आणि इंटर मियामीसह प्रत्येकी एक) यांचा समावेश आहे. याव्यतिरिक्त, त्यानी तीन वेळा यूईएफए सुपर कप आणि तीन वेळा फिफा क्लब विश्वचषक जिंकला आहे.

अर्जेंटिनासह, मेस्सीच्या विजयांमध्ये २००५ अंडर-१७ विश्वचषक, २००८ ऑलिम्पिक गेम्स, २०२१ कोपा अमेरिका, २०२२ फायनलसिमा आणि सर्वात संस्मरणीय म्हणजे २०२२ विश्वचषक, जिथे अर्जेंटिनाने अंतिम फेरीत फ्रान्सवर विजय मिळवला.कोपा अमेरिका फायनलमध्ये कोलंबियाविरुद्धच्या सामन्यात मेस्सीचा विजयाचा प्रवास आव्हानांशिवाय नव्हता. घोट्याच्या गंभीर दुखापतीमुळे ६४व्या मिनिटाला बाहेर पडला. असे असूनही संपूर्ण सामन्यात मेस्सीची उपस्थिती आणि नेतृत्व जाणवले. अर्जेंटिनाने आपली जिद्द दाखवून सामना अतिरिक्त वेळेत नेला. यानंतर ११२व्या मिनिटाला लॉटारो मार्टिनेझने शानदार गोल करत विजयावर शिक्कामोर्तब केला. ज्यामुळे मेस्सीला त्याच्या संघाबरोबर आनंदोत्सव साजरा करण्याची आणि स्टँडमधील अर्जेंटिनाच्या चाहत्यांना अभिवादन करण्याची संधी मिळाली. लिओनेल मेस्सीची कारकीर्द त्याच्या अतुलनीय प्रतिभा, दृढनिश्चय आणि खेळाबद्दलच्या उत्कटतेचा पुरावा आहे. ज्याने फुटबॉलमधील खरा दिग्गज म्हणून त्याचा दर्जा वाढवला आहे.एकेकाळी आंतरराष्ट्रीय स्तरावर खराब कामगिरीमुळे टीकेला सामोरे जाणाऱ्या मेस्सीने आता अर्जेंटिनासह अवघ्या तीन वर्षांत चार प्रमुख विजेतेपदे जिंकली आहेत. ज्यामध्ये एक विश्वचषक, दोन कोपा अमेरिका विजेतेपदाचा समावेश आहे. त्याच्या शानदार क्लब कारकिर्दीत, मेस्सीने बार्सिलोनासह चार चॅम्पियन्स लीग विजेतेपदे आणि दहा ला लीगा चॅम्पियनशिप जिंकली आहेत. त्याच्या वैयक्तिक कामगिरीबद्दल बोलायचे, तर त्याच्याकडे विक्रमी आठ बॅलन डी’ओर्स आणि सहा युरोपियन गोल्डन बूट आहेत. एकूणच, मेस्सीने १,०६८ सामन्यात १२१२ गोल आणि असिस्ट केले आहेत, ज्यामध्ये ८३८ गोल आणि ३७४ असिस्टचा समावेश आहेत.

### संस्मरणीय म्हणजे 2022 विश्वचषक

पुरस्कारांमध्ये १२ लीग जेतेपदे (बार्सिलोनाबरोबर १०, पीएसजीसह दोन), चार यूईएफए चॅम्पियन्स लीग विजेते (सर्व बार्सिलोनासह) आणि १७ देशांतर्गत चषक (बार्सिलोनासह १५, पीएसजी आणि इंटर मियामीसह प्रत्येकी एक) यांचा समावेश आहे. याव्यतिरिक्त, त्यानी तीन वेळा यूईएफए सुपर कप आणि तीन वेळा फिफा क्लब विश्वचषक जिंकला आहे. अर्जेंटिनासह, मेस्सीच्या विजयांमध्ये २००५ अंडर-१७ विश्वचषक, २००८ ऑलिम्पिक गेम्स, २०२१ कोपा अमेरिका, २०२२ फायनलसिमा आणि सर्वात संस्मरणीय म्हणजे २०२२ विश्वचषक, जिथे अर्जेंटिनाने अंतिम फेरीत फ्रान्सवर विजय मिळवला.कोपा अमेरिका फायनलमध्ये कोलंबियाविरुद्धच्या सामन्यात मेस्सीचा विजयाचा प्रवास आव्हानांशिवाय नव्हता.

# गिलने रोहित शर्माला मागे टाकत रचला इतिहास

## संजू सॅमसनने टी-20 क्रिकेटमध्ये केली मोठी कामगिरी

।नवी दिल्ली ।
प्रतिनिधी : महाईन्यूज

**टीम इंडियाचा झिम्बाब्वे दौरा आता संपला आहे. या दौऱ्यात उभय संघांमध्ये पाच सामन्यांची टी-२० मालिका पार पडली आली. शुबमन गिलच्या नेतृत्वाखाली टीम इंडियाने ४-१ असा विजय मिळवला. या मालिकेतील पहिल्या सामन्यात टीम इंडियाला पराभवाचा सामना करावा लागला होता, त्यानंतर भारतीय संघाने शानदार पुनरागमन करत सर्व सामने जिंकून मालिका खिशात घातली. या मालिकेत कर्णधार शुबमन गिलनेही एक खास कामगिरी आपल्या नावावर केली आहे. ज्यामध्ये त्याने रोहित शर्माला मागे टाकले.**




शुबमन गिलकडे पहिल्यांदाच टीम इंडियाचे कर्णधारपद देण्यात आले होते. गिलने त्याच्या नेतृत्वाखाली टीम इंडियासाठी पहिली टी-२० मालिका जिंकली. या मालिकेत गिलची कामगिरीही चांगली होती. फलंदाजी करताना गिलने या मालिकेत १७० धावा केल्या. यादरम्यान त्याने दोन अर्धशतकेही झळकावली. टी-२० मालिकेत कर्णधार म्हणून सर्वाधिक धावा करणारा गिल हा दुसरा खेळाडू ठरला आहे.शुबमन गिल आता रोहित शर्माच्या पुढे गेला आहे. रोहित शर्माने कर्णधार म्हणून २०१७ मध्ये श्रीलंकेविरुद्धच्या टी-२० मालिकेत १६२ धावा केल्या होत्या. आता शुबमन गिलच्या पुढे फक्त टीम इंडियाचा स्टार फलंदाज विराट कोहली आहे. कर्णधार म्हणून विराट कोहलीने २०२१ मध्ये इंग्लंडविरुद्धच्या टी-२० मालिकेत २३१ धावा केल्या होत्या. संजू सॅमसनसाठी हा षटकार खूप खास होता. या षटकारासह त्याने आपल्या टी-२० कारकिर्दीतील ३०० षटकारही पूर्ण केले. टी-२० क्रिकेटमध्ये ३०० षटकार मारणारा तो सातवा भारतीय फलंदाज ठरला आहे.

### टीम इंडियाने पाचवा सामना जिंकला

त्याने आपल्या टी-२० कारकिर्दीत आतापर्यंत ३०२ षटकार मारले आहेत. त्याचवेळी संजूने या सामन्यात अवघ्या ३९ चेंडूत आपले अर्धशतक पूर्ण केले. त्याने ४५ चेंडूत एकूण ५८ धावा केल्या. यादरम्यान संजूच्या बॅटमधून एक चौकार आणि ४ षटकार दिसले. हे त्याचे टी-२० आंतरराष्ट्रीय कारकिर्दीतील दुसरे अर्धशतक आहे.भारत आणि झिम्बाब्वे यांच्यातील पाच सामन्यांच्या मालिकेतील शेवटचा सामना १४ जुलै रोजी हरारे येथे खेळला गेला. या सामन्यात प्रथम फलंदाजी करताना टीम इंडियाने २० षटकात ६ गडी गमावून १६७ धावा केल्या. टीम इंडियाकडून फलंदाजी करताना संजू सॅमसनने सर्वाधिक ५८ धावांची खेळी केली. १६८ धावांच्या लक्ष्याचा पाठलाग करताना यजमान झिम्बाब्वेचा संघ १८.३ षटकात १२५ धावांवर सर्वबाद झाला. भारतीय संघाकडून गोलंदाजी करताना मुकेश कुमारने सर्वाधिक ४ विकेट्स घेतल्या.रा आता संपला आहे. या दौऱ्यात उभय संघांमध्ये पाच सामन्यांची टी-२० मालिका पार पडली आली.